8/22/24, 7:46 PM IQAC-1-panyache - Kalpana Bhajni.jpg



15

# शाश्वत विकासात पाण्याचे महत्त्व

डॉ. कल्पना भजनी
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
कमला नेहरू महाविद्यालय नागपूर

डॉ. कांचनमाला क्षीरसागर
एल.ए.डी. ॲन्ड एस.आर.पी. कॉलेज फॉर वुमेन्स
नागपूर

***********

**सारांश :**

विकास ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. विकासातंर्गत औद्योगिकीकरण, नागरीकरण होतांना नैसर्गिक संसाधनाचा अनिर्बंध वापर होतो. मानवाने पर्यावरणाकडे दुर्लक्ष करून अशाश्वत पद्धतीने विकास करण्याचा, आपली जीवनशैली बदलविण्याचा प्रयत्न केला. त्यामूळे पर्यावरणावर ताण निर्माण होवून पर्यावरण असंतूलन होवून त्याचाच विपरीत प्ररिणम मनुष्य समाजावर झाला आहे. पर्यावरणातील हवा, पाणी, जमिन हे महत्त्वपूर्ण घटक आहे. यात पाणी अत्यंत महत्वाचा घटक असून 'पाणी म्हणजे जीवन', पाण्याशिवाय जगण्याची कल्पना होऊ शकत नाही. विकासात पाण्याचा नियोजनपूर्वक वापर करून, पर्यावरण संतूलन कायम टिकून राहिल व भावी पिढीला योग्य वितरण होईल असा उपयोग करणे म्हणजे शाश्वत विकास होय.

**प्रस्तावना :**

देशाचा विकास करतांना तो विकास शाश्वत किंवा टिकावू कसा होईल हे बघणे अत्यावश्यक झाले आहे. कारण या विकासाची किंमत पूढच्या पिढीला चूकवावी लागत असेल तर तो विकास घातक आहे. औद्योगिक क्रांतीने अर्थव्यवस्थेचा विकास होत असला तरी पर्यावरण ऱ्हास ही झपाटयाने होत आहे. विकासाकडे वाटचाल करतांना पर्यावरणाकडे मोठया प्रमाणात दुर्लक्ष झाले व यातूनच शाश्वत विकास संकल्पनेचा उदय झाला. या संकल्पनेत अर्थव्यवस्थेचा विकास करतांना समाज, निसर्ग व विकास असा समन्वय अंतर्भत असतो. विकास हा केवळ आर्थिक न होता तो शाश्वत विकास व्हावा, पुढच्या पिढीला नुकसानदायी न ठरता लाभदायी ठरावा असे यात अपेक्षित असते.

**महत्वपूर्ण शब्द :** शाश्वत विकास, पाणी, पर्यावरण, अर्थव्यवस्था, समाज.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तूत संशोधन पद्धती दुय्यम समंकावर आधारीत आहे. दुय्यम समंकात शाश्वत विकासाशी संबंधित विविध पुस्तके व संकेत स्थळांद्वारे प्रकाशीत झालेल्या माहितीचा समावेश करण्यात आला आहे.

**उद्दिष्टये :**

१) विकासातंर्गत पाण्याचे महत्व जाणून घेणे.
२) जलसंरक्षणाचे उपाय अभ्यासणे.

**गृहितके :**

१) पाणी विकासाचा आधारस्तंभ आहे.
२) पाण्याचे नियोजन केल्यास पाण्याची बचत होते.

**चर्चात्मक विश्लेषण :**

विकास ही निरंतर प्रक्रिया असून ही अनादिकाळापासून सुरू आहे. परंतु आज या विकासाचे चिंतन करण्याची गरज निर्माण झाली आहे. कारण या विकासात पर्यावरणीय साधने वापरतांना घ्यावयाची आवश्यक ती काळजी घेण्यात आलेली नाहीं. त्यामूळे पर्यावरणाचा ऱ्हास झाला म्हणून या विकासाला शाश्वत विकास म्हणता येत नाही. केवळ अल्पकालीन विकासासाठी भावी पिढयांचा वापर न करता तिचा अतिवापर किंवा गैरवापर शाश्वत विकासात अपेक्षित नाही. देशातील नैसर्गिक संपत्तीवर त्या देशातील पिढया न पिढयांची संयूक्त मालकी असते. कारण शाश्वत विकास म्हणजेच स्थिर विकास, टिकावू विकास, कायम विकास, सतत विकास, निरंतर विकास, निर्वाह योग्य विकास असे म्हटल्या जाते.

**डॉ. जी. एच. ब्रन्डलॅन्ड :** "भावी पिढयांच्या गरजांशी तडजोड न करता वर्तमान पिढीच्या गरजा भागविणे



https://drive.google.com/file/d/194Ik1NunThDbGZAZGVFq2mf3zG0DpVPD/view 1/1